**ठळक बातम्या**

- विधानपरिषद उपसभापतीपदासाठी सचिन अहिर यांचा महायुतीच्या पाठिंब्यावर अर्ज दाखल/ महाविकास आघाडीकडून शिक्षणतज्ज्ञ जगन्नाथ अभ्यंकर यांचा अर्ज दाखल

- अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाबाबत बदर समितीच्या अहवालावर सूचना, हरकती विचारात घेऊनच व्यापक चर्चेअंती अंतिम निर्णय घेण्याचं मुख्यमंत्र्यांचं विधानसभेत आश्वासन

- अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी मांडलेल्या ९७ हजार ७०६ कोटी ४० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या विधानसभेत मंजूर

- मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण प्रक्रियेला प्रारंभ

**आणि**

- मोसमी पावसाचं आगमन लांबणीवर पडल्यामुळे देशभर खरीपाच्या पेरण्यांत घट

**<><><><><>**

विधानपरिषदेच्या उपसभापतीपदाच्या निवडणुकीसाठी सचिन अहिर यांनी आज उमेदवारीअर्ज दाखल केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार, नीलम गोऱ्हे, चंद्रकांत पाटील, संजय राठोड, संजय शिरसाट आदी नेते यावेळी उपस्थित होते. अहिर हे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आहेत, मात्र त्यांना महायुतीनं निवडणुकीसाठी पाठिंबा दिला आहे. विधानपरिषदेच्या उपसभापतीपदाची निवडणूक उद्या होणार आहे. त्यासाठी महाविकास आघाडीकडून शिक्षणतज्ज्ञ जगन्नाथ अभ्यंकर यांनी अर्ज दाखल केला. या अर्जांची आता छाननी होत असून, त्यानंतर आवश्यकता भासली तर निवडणूक होईल.

दरम्यान, सदनात आपली संख्या कमी असली तरी लोकशाही प्रक्रियेत भाग घेणं, ही विरोधी पक्ष म्हणून जबाबदारी असल्यामुळे या निवडणुकीत उतरत असल्याचं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार अंबादास दानवे यांनी सांगितलं. तर, आमदार आदित्य ठाकरे म्हणाले…

**होल्ड - बाईट- आदित्य ठाकरे**

**एमपीएससी** अर्थात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होणारी भरती प्रक्रिया अधिक जलद, पारदर्शक आणि कार्यक्षम होण्यासाठी सीबीटी अर्थात संगणक आधारित परीक्षा पद्धतीचा वापर करण्याचा निर्णय सरकारनं घेतल्याची माहिती, सामान्य प्रशासन विभाग मंत्री आशीष शेलार यांनी दिली. ऑफलाईन परीक्षा घेण्यासाठी शाळा आणि महाविद्यालयांवर अवलंबून राहावं लागतं, केंद्र सरकार, विविध राज्यं, बँका आणि इतर संस्थांच्या स्पर्धा परीक्षा याच काळात होत असल्याने परीक्षा केंद्रं उपलब्ध नसतात. त्यामुळे सीबीटी पद्धत अधिक उपयुक्त आहे, असं शेलार म्हणाले.

**<><><><><>**

विधानपरिषदेतले आमदार सचिन अहिर यांनी आज एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालच्या शिवसेनेत प्रवेश केला. विधान परिषद उपसभापती पदासाठी आज अर्ज भरण्यापूर्वी अहिर यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सर्व पदांचा राजीनामा दिला.

सचिन अहिर हे धनुष्यबाणाच्या चिन्हावर निवडून आलेले असून ते शिवसेनेचेच आमदार आहेत असा दावा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे. ते आज दुपारी मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ६ खासदार शिवसेनेत आल्यानंतर आहिर यांच्या प्रवेशानं शिवसेनेची ताकद आणखी वाढेल असं ते म्हणाले.

**<><><><><>**

**अनुसूचित** जातींच्या उपवर्गीकरणाबाबत बदर समितीच्या अहवालावर सूचना, हरकती विचारात घेऊनच व्यापक चर्चेअंती अंतिम निर्णय घेऊ, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत दिली. यात कोणावरही अन्याय होणार नाही, असं ते म्हणाले. उपवर्गीकरणाला विरोध नोंदवत या विषयावर बोलू देण्याची मागणी विरोधकांनी केली. अध्यक्षांनी त्यांना जागेवर बसायची सूचना केली, मात्र विरोधकांनी बोलू देण्याची मागणी लावून धरली आणि ती मान्य न झाल्याने सभात्याग केला.

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात सुधारणा विधेयक विधानसभेत सादर झालं. विकास करार रद्द, निरस्त किंवा समाप्त झाला तर मुद्रांक शुल्काचा परतावा किंवा सवलत दिली जाणार नाही अशी तरतूद या विधेयकात आहे.

**<><><><><>**

राज्य सरकारनं पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी मांडलेल्या ९७ हजार ७०६ कोटी ४० लाख रुपयांच्या सर्व पुरवणी मागण्या विधानसभेनं आज मंजूर केल्या. या मागण्यांवरची चर्चा काल सभागृहात सुरू झाली होती, ती आज पुढे नेण्यात आली. या चर्चेला मंत्री शिवेंद्रराजे भोसले आणि माधुरी मिसाळ यांनी उत्तर दिलं. त्यानंतर सर्व विभागांच्या पुरवणी मागण्या आवाजी मतदानानं मंजूर झाल्या.

**<><><><><>**

राज्यात मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण प्रक्रियेला आजपासून सुरूवात झाली. याअंतर्गत येत्या २९ जुलैपर्यंत बूथस्तरीय अधिकारी घरोघरी प्रत्यक्ष भेट देऊन गणना अर्ज वाटप करतील आणि भरलेले अर्ज परत घेतील. त्यानंतर येत्या पाच ऑगस्ट रोजी प्रारुप मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जातील. त्यानंतर चार सप्टेंबरपर्यंत प्रारुप यादीवर दावे आणि हरकती नोंदवता येतील, आणि सात ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जातील. या प्रक्रियेसाठी राज्यात एक लाखाहून अधिक बीएलओ नियुक्त केले आहेत.

<><><><><>

मान्सूनच्या पावसाचं आगमन लांबणीवर पडल्यामुळे देशात यंदा खरीप पिकाची पेरणी कमी प्रमाणात झाल्याचं कृषी मंत्रालयानं म्हटलं आहे. जून महिन्यात १८२ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे, गेल्यावर्षी याच काळात २३६ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली होती, त्यामुळे गेल्यावर्षीच्या तुलनेत यावर्षी पेरणीत २३ टक्के घट झाली आहे. भात, तेलबिया, भरड धान्य, कडधान्य, कापूस या सर्व पिकांवर पाऊस उशीरा आल्यामुळे परिणाम झाल्याचं कृषी मंत्रालयानं सांगितलं.
भात पेरणीत २५ टक्क्यापेक्षा जास्त घट झाली आहे, कडधान्यात ३० टक्के, तेलबिया ५० टक्के तर कापूस लागवडीत ३४ टक्के घट झाली आहे.
दुसरीकडे उसाच्या लागवडीत ५७ टक्के वाढ झाल्याचं कृषी मंत्रालयाने सांगितलं.

<><><><><>

राज्यात पुढच्या काही दिवसांत पावसाचा जोर वाढणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. गेल्या २४ तासांत मान्सून पुन्हा सक्रीय झाला असून कोकण, विदर्भ आणि मराठवाड्यात पावसाची नोंद झाली. बीड, अहिल्यानगर, जळगाव आणि लातूर या जिल्ह्यांना पुढच्या चार दिवसांसाठी 'यलो अलर्ट' दिला आहे. तसेच २ आणि ३ जुलै रोजी विदर्भ आणि मराठवाड्याच्या काही भागांत विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मुंबईसह कोकणात तुरळक ठिकाणी ३ जुलैपर्यंत जोरदार ते अतिजोरदार पाऊस पडेल असा अंदाज भारतीय हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात पावसाचा जोर वाढला आहे. पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे जिल्ह्यात काही ठिकाणी पडझडीच्या घटना घडल्या. कुडाळ तालुक्यात वालावल इथं दरड कोसळून मोठा दगड पायथ्याशी असलेल्या घराला धडकल्यामुळे घराचं नुकसान झालं.

रत्नागिरी जिल्ह्यात आज सकाळी संपलेल्या २४ तासांमध्ये सरासरी १०६ मिलिमीटर पाऊस पडला. रत्नागिरी तालुक्यात सर्वाधिक १४४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. रत्नागिरीत आज संपूर्ण दिवसभर पावसाचा जोर कायम आहे.

**<><><><>**

अनुसूचित  जातींच्या उपवर्गीकरणाविरोधात आज मुंबईत मोर्चा निघाला. यात राज्यभरातून हजारो जण सहभागी झाले. या मोर्चाला मेट्रो सिनेमापासून सुरुवात झाली आणि आझाद मैदानावर या मोर्चाचं सभेत रुपांतर झालं. यात रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर, माजी मंत्री राजकुमार बडोले, बबनराव घोलप, जोगेंद्र कवाडे, राजेंद्र गवई सहभागी झाले होते.

**<><><><>**

सलग नवव्या तिमाहीसाठी सरकारनं विविध लघु बचत योजनांचे व्याजदर जैसे थे ठेवले आहेत. उद्या ते ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत ही तिमाही आहे. केंद्रीय अर्थ मंत्रालयानं आज ही माहिती दिली. सुकन्या समृद्धी योजनेचा व्याजदर ८ पूर्णांक २ दशांश टक्के आहे. तर चालू तिमाहीत तीन वर्षांच्या मुदत ठेवींवरचा व्याजदर ७ पूर्णांक १ दशांश टक्क्यांवर कायम आहे.पीपीएफ अर्थात पब्लिक प्रॉव्हिडंट फंडाचा व्याजदर ७ पूर्णांक १ दशांश टक्के तर एनएससी अर्थात नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकेटचा ७ पूर्णांक ७ दशांश टक्क्यावर कायम आहे.

**<><><><>**

गेल्या चोवीस तासात कोकणात काही ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला. येत्या दोन दिवसात कोकण, आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात अनेक ठिकाणी, तर मराठवाड्यात काही ठिकाणी, पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**//<><><><>//**